व्यक्ति सर्वदा अन्यायाच्या साथी नसावा, पण न्यायाच्या साथी असावा

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शनिवार ३ मे २०२५ | अंक १४२ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



SUN Tourism INTERNATIONALL PVT. LTD. Since 2007 All TOURS घर से घर तक दिल से दिल तक I'TIME in TRAVEL INDUSTRY www.suntourismpune.in

सन टुरिझम

प्रस्तुत करते

देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !

आमच्या विशेष टूर पॅकेजेस

काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...

-: अधिक माहितीसाठी संपर्क :-

99222 22272 / 7602727555


# क्रिएट इन इंडिया, क्रिएट फॉर द वर्ल्ड- पंतप्रधान नरेंद्र मोदींची मुंबईतून नवी घोषणा

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे मुंबई दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यावेळी त्यांनी न्यूज 9 ने आयोजित WAVES Edition ग्लोबल समिटला भेट दिली. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी भारताच्या प्रत्येक गल्लीत कहानी आहे. आपल्याकडे बरंच काही आहे. म्हणूनच म्हणतो यही समय है, सही समय क्रिएट इन इंडिया, क्रिएट फॉर द वर्ल्डसाठीची हीच योग्य वेळ आहे, असे आवाहन पंतप्रधान मोदींनी केले. जिओ कनव्हेन्शन सेंटरमध्ये आयोजित शिखर परिषदेत ते बोलत होते.

प्रत्येक कहाणी भारतीय संस्कृतीचा आवाज बनून जगाच्या मनात बसली आज १ मे आहे. आजपासून ११२ वर्षापूर्वी २ मे १९१३ रोजी भारतात पहिली फिचर फिल्म राजा हरिश्चंद्र रिलीज झाली होती. त्याचे निर्माते दादासाहेब फाळके होते. कालच त्यांची जयंती झाली. गेल्या एका दशकात भारतीय सिनेमाने भारताला जगाच्या



कानाकोपऱ्यात नेण्यात यश मिळवलं आहे. रशियात राज कपूर यांची लोकप्रियता, कानमध्ये सत्यजित रे यांची लोकप्रियेता. आणि ऑस्करमध्ये तेच दिसतं. गुरुदत्त यांची सिनेमॅटिक पोएट्री असो किंवा ऋत्विक घटक यांचं सोशल रिफ्लेक्शन असो. ए आर रहमान यांचं संगीत असो की राजामौलींची महागाथा असो प्रत्येक कहाणी भारतीय संस्कृतीचा आवाज बनून जगाच्या मनात बसली आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. आपण भारतीय सिनेमाच्या अनेक दिग्गजांना टपाल तिकिटाच्या माध्यमातून स्मरणात ठेवलं आहे. गेल्या काळात मी गेमिंग वर्ल्ड, फिल्ममेकर, अभिनेते, संगीतकारांना भेटलो. त्यांच्याशी चर्चा केली. त्यात भारताची क्रिएटिव्हिटी आणि ग्लोबल कॉलोबोशनची चर्चा व्हायची. मी तुमच्याकडून आयडिया घ्यायचो. मलाही या विषयात खोलवर जाण्याची संधी मिळायची. मी एक प्रयोग केली. सहा सात वर्षापूर्वी मी गांधी जयंतीनिमित्ताने १५० देशातील गायक गायिकांना गांधींचं गीत गायला प्रेरित केलं. गांधींच्या १५०व्या जयंतीनिमित्ताने जगभरातील गायकांनी ते गायलं. याचा परिणाम म्हणजे जग एकसाथ आलं. या ठिकाणी अनेक लोक आहेत. त्यांनीही त्यावेळी आपले दोन दोन तीन तीन मिनिटाचे व्हिडीओ केले होते. भारत आणि जगातील क्रिएटीव्ह लोक काय करू शकतो हे दाखवून दिलं. आज त्याच काळातील कल्पना वास्तवात आली आहे. जसा नवीन सूर्य उगवल्यावर आकाशाला रंग देतो. तसंच ही समिट आपल्या पहिल्या पर्वापासूनच चमकत आहे, असे प्रतिपादन मोदींनी केले.

आमच्या अडव्हायजरी बोर्डाच्या सर्व सहकाऱ्यांनी जी मेहनत घेतली आहे. ती दिसत आहे. तुम्ही क्रिएटर चॅलेंजची मोहीम हाती घेतली. जगातील ६० देशातून १ लाख क्रिएटिव्ह लोकांनी भाग घेतला. ८०० फायनलिस्ट निवडले गेले. मी सर्व फायनलिस्टला शुभेच्छा देत आहे. जगात छाप पाडण्याची, काही करून दाखवण्याची तुम्हाला संधी मिळाली आहे. तुम्ही भारत पव्हेलियनमध्ये बरंच काही नवं केलं आहे. मला ते पाहायचं आहे. मी उत्सुक आहे. व्हेव बाजारातील इनिशिएटिव्ह महत्त्वाचं आहे. यातून नवे क्रिएटर तयार होतील. नव्या बाजाराला जोडले जातील. बायर्स आणि कलेक्टरला जोडण्याची सुरुवात चांगली आहे. जन्माला आलेल्या

## क्रिएट इन इंडिया, क्रिएट फॉर द वर्ल्ड

भारता थर्ड लार्जेस्ट इकोनॉमी बनत आहे. भारत ग्लोबल फिनटेक अडोप्शन रेटमध्ये नंबर वन आहे. जगातील सर्वात मोठा मोबाईल मॅन्युफॅक्चरर आहे. स्टार्टअप इको सिस्टिम भारतात आहे. विकसित भारताचा प्रवास आता सुरू झाला आहे. भारत बिलियन प्लस स्टोरीजचा देश आहे. २००० वर्षापूर्वी जेव्हा भरतमुनीने नाट्यशास्त्र लिहिलं. त्यांचा संदेश होता. कला संसाराला भावना देतात. इमोशन देतात. फिलिंग्र देतात. शतकापूर्वी कालिदासने शाकुंतलम लिहिलं तेव्हा भारताने क्लासिकल ड्रामाला दिशा दिली. भारताच्या प्रत्येक गल्लीत कहानी आहे, प्रत्येक पर्वत गीत आहे. प्रत्येक नदी काहींना काही गात असते. देशातील ६ लाख गावात गेला तर त्यांचं एक फोक आहे. त्यांचं स्टोरी टेलिंगचा अनोखा अंदाज आहे. लोककथेच्या माध्यमातून विविध समाजाने इतिहास पुढे नेला आहे. संगीत ही आपल्यासाठी साधना आहे. गजल आणि भजन असो प्रत्येक सूरात कहाणी आहे. प्रत्येक तालमध्ये आत्मा आहे.

# राजधानीत महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

नवी दिल्ली, 01 : महाराष्ट्र राज्याच्या 66 व्या स्थापना दिनानिमित्त राजधानी दिल्लीत मोठ्या उत्साहाने महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. उभय महाराष्ट्र सदनात निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांच्या हस्ते आज ध्वजारोहण करण्यात आले. कस्तुरबा गांधी मार्गस्थित आणि कॉपर्निकस मार्गस्थित महाराष्ट्र सदनात ध्वजारोहण झाले. यावेळी उपस्थितांनी राष्ट्रगीतासोबत राज्य गीत 'गर्जा महाराष्ट्र माझा…' गाऊन ध्वजवंदन केले. या कार्यक्रमास अपर निवासी आयुक्त डॉ. नीवा जैन, सहायक निवासी आयुक्त डॉ. राजेश अडपावार, श्रीमती स्मिता शेलार, महाराष्ट्र परिचय केंद्राच्या उपसंचालक अमरजीत कौर अरोरा, माहिती अधिकारी अंजु निमसरकर व कर्मचारी, महाराष्ट्र सुरक्षा रक्षक, महाराष्ट्र सदनात निवासी असणारे अभ्यागत, दिल्लीतील महाराष्ट्र शासनाच्या विविध कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



महाराष्ट्र दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम* दिल्ली शासनाचे उपराज्यपाल कार्यालयातर्फे सायंकाळी महाराष्ट्र आणि गुजरात स्थापना दिनानिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास दिल्लीचे उपराज्यपाल विनय कुमार सक्सेना, मुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि केंद्रीय गृह तथा सहकार मंत्री अमित शाह यांच्या प्रमुख उपस्थितीत हा विशेष कार्यक्रम साजरा करण्यात येणार आहे. यावेळी दिल्लीत विविध क्षेत्रांत कार्यरत मराठी भाषिक मान्यवरांशी संवाद साधून त्यांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा देऊन महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वैभवाचे प्रदर्शन या ठिकाणी करण्यात येणार आहे. कस्तुरबा गांधी मार्गावरील महाराष्ट्र सदनात महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ठेव्याचा जागर करणारा खास सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या कृषी खात्याच्या सहकार्याने आणि कोकण हापूस आंबा उत्पादक संघ, देवगड, सिंधुदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने 1 व 2 मे दरम्यान भौगोलिक मानांकन प्राप्त हापूस आंब्याचे विक्री प्रदर्शनाचे आज उद्घाटन करण्यात आले. निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांच्या हस्ते करण्यात आले. या निमित्ताने 'महाराष्ट्राचा सुगंधी राजा' हापूस आंब्याची खरेदी करण्याचीही सुवर्णसंधी दिल्लीकरांना उपलब्ध झाली आहे. महाराष्ट्र दिनानिमित्त आयोजित या वैविध्यपूर्ण कार्यक्रमांत मराठी आणि अमराठी भाषिक दिल्लीकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या उत्सवाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या गौरवशाली परंपरा आणि सांस्कृतिक वैभव सर्वांपर्यंत पोहोचणार आहे

# विभागीय माहिती कार्यालयात महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहण



छत्रपती संभाजीनगर, दि. 01- माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या संचालक माहिती कार्यालय, जिल्हा माहिती कार्यालय आणि माहिती केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या वर्धापन दिनानिमित्त जिल्हा माहिती अधिकारी डॉ.मिलिंद दुसाने यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सर्वांनी राष्ट्रीय ध्वजास सलामी देऊन राष्ट्रगीत म्हटले. याप्रसंगी सहायक संचालक गणेश फुंदे, सहायक अधीक्षक प्रविण भानेगावकर, प्रदर्शन सहायक राजेंद्र वाणी आदींसह संचालक कार्यालय, जिल्हा माहिती कार्यालय, माहिती केंद्रातील कर्मचारी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय

## जिल्हास्तरीय मदत कक्षाचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते उद्घाटन

नांदेड जिह्ला प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालयांमार्फत नागरिकांना द्यावयाच्या मदतीसाठी कार्य करणाऱ्या जिल्हास्तरीय मदत कक्षाचे आज राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धाविकास, अपारंपारिक ऊर्जा मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

जिह्लाधिकारी कार्यालय परिसरात हा कार्यक्रम पार पडला. जिह्लाधिकारी कार्यालय



परिसरातील प्रशिक्षण भवनच्या इमारतीत हा कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. यावेळी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, खासदार रविंद्र चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार राजेश पवार, आमदार जितेश अंतापूरकर, जिह्लाधिकारी राहुल कर्डीले, अपर जिह्लाधिकारी पी.एस. बोरगावकर, निवासी उपजिह्लाधिकारी महेश वडदकर, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख, जिह्ला शल्य चिकित्सक डॉ. निळकंठ भोसीकर, जिह्ला आरोग्य अधिकारी डॉ. संगीता चव्हाण, यांच्यासह आरोग्य विभागाचे व जिह्लाधिकारी कार्यालयाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील जिह्लाधिकारी कार्यालयात, जिह्लास्तरीय मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षाद्वारे रुग्णांना वैद्यकीय उपचाराकरीता अर्थसहाय्य सहज उपलब्ध व्हावे, नागरिकांना मुख्यमंत्री सहायता निधीच्या प्रकरणाची माहिती आपल्याच जिल्ह्यात व्हावी तसेच नागरिकांच्या पैशाचा व वेळेचा अपव्यव टाळण्यासाठी हा कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

# उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी केले मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे उद्घाटन

बीड, दि. 1 (जि.मा.का.) : राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार येथील जिह्लाधिकारी कार्यालयात उभारण्यात आले. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे उद्घाटन आज उद्योग व बांधकाम राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या हस्ते झाले. . यावेळी जिह्लाधिकारी विवेक जॉन्सन, जिह्ला परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत तसेच या कक्षाचे प्रमुख चैतन्य कागदे आदींची प्रमुख उपस्थिती



होती. कक्षाचे फीत त कापून उद्घाटन केल्यानंतर श्री नाईक यांनी या कक्षाची पाहणी केली तसेच येथील कामाबाबत माहिती घेतली तसेच अधिक चांगले काम करण्याबाबत यावेळी मार्गदर्शन केले.

येथील जिह्लाधिकारी कार्यालयाच्या इमारतीमध्ये तळमजल्यावर हा कक्ष उभारण्यात आला आहे. ज्या गरजूंना वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदतीची गरज लागणार आहे अशांना येथे अर्ज करता येईल. त्यांना मार्गदर्शनासोबतच उपचार सुरू असणाऱ्या रुग्णालयाशी समन्वय आणि आर्थिक मदत या ठिकाणी मिळू शकेल. यापूर्वी मुंबई येथे अर्ज करावा लागत होता मात्र जिह्ला मुख्यालयातच ही सुविधा उपलब्ध झाल्याने गरजू रुग्णांची मोठी सोय होणार आहे.

# अनिलदादा जगताप यांच्या उपस्थितीत अशोक दुधाळ यांची शिवसेना बीड तालुका ओबीसी व्हिजेएनटी तालुका अध्यक्षपदी नियुक्ती!

**अशोक दुधाळ हे सामाजिक प्रश्नांवर सातत्याने काम करणारे कार्यकर्ते असून, ओबीसी व व्हिजेएनटी समाजाच्या हक्कांसाठी नेहमी पुढाकार घेत आले आहेत**

बीड, प्रतिनिधी – हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन तथा महाराष्ट्रा राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते माननीय नामदार एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या नेतृवाखाली सुरु असलेल्या शिवसेनेच्या दमदार कार्यपद्धतीस प्रभावित होऊन ओबीसी व्ही जे एनटी सेना महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बाळासाहेबजी किसवे साहेब आणि शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, ओबीसी व्ही जे एनटी सेना महाराष्ट्र राज्य संपर्कप्रमुख किरण चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली तथा ओबीसी व्ही जे एनटी सेना जिल्हाप्रमुख मनोज चव्हाण यांच्या माध्यमातून अशोक दुधाळ यांची शिवसेना बीड तालुका ओबीसी / व्हिजेएनटी तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती शिवसेना बीड जिल्हाप्रमुख मा. अनिल दादा जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत, ओबीसी / व्हिजेएनटी सेल जिल्हाप्रमुख श्री. मनोज चव्हाण यांच्या माध्यमातून पार पडली.

अशोक दुधाळ हे सामाजिक प्रश्नांवर सातत्याने काम करणारे कार्यकर्ते असून, ओबीसी व व्हिजेएनटी समाजाच्या हक्कांसाठी नेहमी पुढाकार घेत आले आहेत. त्यांच्या या नियुक्तीमुळे स्थानिक पातळीवर ओबीसी आणि व्हिजेएनटी समाजाला नवी दिशा व बळ मिळेल, असा विश्वास पक्षाने व्यक्त केला आहे. धर्मवीर आनंद दिघे साहेब यांची निष्ठा व संघटन कौशल्य, तसेच शिवसेना प्रमुख बाळासाहेब



ठाकरे याचा हिंदुत्वाचा वारसा हे प्रेरणास्थान मानून, अशोक दुधाळ हे पक्षवाढीच्या कामात स्वतःला झोकून देतील आणि सर्व घटकांना बरोबर घेऊन प्रभावीपणे कार्य करतील, अशी अपेक्षा वरिष्ठ नेतृत्वाकडून व्यक्त करण्यात आली आहे.

नियुक्तीनंतर अशोक दुधाळ यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, "ही जबाबदारी मोठी असून, पक्ष नेतृत्वाने दाखवलेल्या विश्वासाला मी पात्र ठरेल. समाजाच्या न्याय हक्कांसाठी मी संघर्ष करत राहीन आणि शिवसेनेच्या ध्येयधोरणांनुसार कार्य करीन."

००००० 

# संपादकीय

## भारतीय जवानांचे अतुलनीय साहस आणि कठोर प्रशिक्षण घेऊन देशरक्षणासाठी उभा असलेला सामान्य जवान

संजय पाटील, essenet २०२५ एक अत्यंत मार्मिक आणि विचार करायला लावणारा विषय म्हणजे आज संपूर्ण देशात चीन आणि पाकिस्तानला धडा शिकवण्याच्या चर्चा रंगल्या आहेत. सोशल मिडियावर, राजकीय व्यासपीठांवर आणि सर्वसामान्यांच्या चर्चांमध्ये देशभक्तीचा आविष्कार होताना दिसतो. पण खरेच, हे शत्रूराष्ट्रांना धडा शिकवणार कोण? हे काम केवळ घोषणा देणाऱ्या नेत्यांचे, चित्रपटातील देशभक्ती दाखवणाऱ्या अभिनेत्यांचे, किंवा फक्त कायदा पाळवणाऱ्या पोलीस यंत्रणेचे आहे का?

नाही! प्रत्यक्षात सीमारेषेवर उभा असतो तो एक सामान्य जवान — जो अनेकदा आपल्या रोजच्या जीवनात दुर्लक्षित होतो. तोच जवान ज्याला आपण ट्रेनमध्ये बसायला जागा देत नाही. तोच जवान जो सिव्हिल ड्रेसमध्ये असतो, तेव्हा आपल्या ओळखीबाहेर असतो. अशा या जवानाकडे आपण अनेकदा उपेक्षेने पाहतो. सरकारी कामांसाठी तो चकरा मारतो, मदतीसाठी अर्ज करतो, पण त्याला तिथेही आधार मिळत नाही.

त्याच्या परिवारालाही सरकारी यंत्रणांकडून वेळेवर मदत मिळत नाही. तो आपल्या आई-वडिलांना, पत्नीला, आणि मुलांना सोडून सीमेवर उभा असतो, आणि देशासाठी जीव देण्याची तयारी ठेवतो. पण आपण त्याच्या बलिदानाकडे केवळ एक बातमी म्हणून पाहतो. आपण कधी त्याला ओळख देतो, तर कधी त्याच्या गरजा विसरतो.


अशा या सैनिकाच्या कष्टांमुळेच आपण सुरक्षित झोपू शकतो. तोच सैनिक सीमेवर बर्फात, वाळवंटात, जंगलात अथवा उंच पर्वतरांगांमध्ये दुर्गम भागांत तैनात असतो. तो आपल्या सुखसोयींचा त्याग करून देशाचे संरक्षण करत असतो. आणि म्हणूनच, जेव्हा चीन किंवा पाकिस्तान देशाविरुद्ध आग ओकतात, तेव्हा तोच सामान्य जवान भिंतीप्रमाणे उभा राहतो.

एक भारतीय सैनिक आपल्या प्रशिक्षण काळात जे अत्यंत कठीण आणि धाडसी प्रशिक्षण घेतो, ते सामान्य माणसाच्या कल्पनेपलीकडचे असते. आगीतून उडी मारून बाहेर येणे, उंच कड्यांवरून दोरीच्या साहाय्याने उतरणे, बर्फाच्छादित प्रदेशात -४० अंश सेल्सिअस तापमानात अनेक तास पहारा देणे, जंगलांमध्ये दिवसरात्र हालचाली करत शत्रूला चकवा देणे, हजारो फूट उंचीवर ऑक्सिजनअभावी धावणे, रणगाड्यांच्या खाली जाऊन स्फोटक हटविणे, आणि मृत्यूच्या छायेत राहूनही शिस्तबद्धतेने प्रत्येक आज्ञा पार पाडणे हे सर्व त्यांच्या कठोर प्रशिक्षणाचा भाग असतो. या प्रशिक्षणामुळेच सैनिक संकटांच्या वेळी कधीही मागे हटत नाही, कारण त्याला प्रत्येक परिस्थितीचा सामना करण्यासाठी तयार केलेले असते.

देशासाठी लढणारा हा जवान कोणत्याही प्रसिद्धीचा मोह न ठेवता, कोणत्याही अपेक्षेचा विचार न करता फक्त कर्तव्यभावनेने झगडत असतो. आपण मात्र फक्त 'जय जवान' म्हणत फोटो शेअर करून थांबतो. पण खरा आदर म्हणजे त्यांच्या समस्या जाणून घेणे, त्यांना सन्मानाने वागवणे, आणि त्यांच्या कुटुंबाचा खंबीर पाठिंबा होणे.

आपण सर्वांनी ठरवले पाहिजे की, या देशरक्षक सैनिकांप्रती आपल्या वागणुकीत बदल घडवून आणायचा. त्यांच्या योगदानाची जाणीव ठेवायची. कारण एक जवान फक्त रणांगणावर लढत नाही, तो आपल्या समाजातील उदासीनतेशीही लढत असतो.

शुभ सकाळ, आणि अशा वीर जवानांना सलाम!




# सामान्यांसह शेतकऱ्यांच्या हिताच्या योजना राबविण्यावर शासनाचा भर : पालकमंत्री अतुल सावे

नांदेड जिल्हा प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : राज्य शासन नेहमी सामान्य नागरिक, शेतकरी यांना केंद्रस्थानी ठेवून त्यांच्या हिताच्या योजना राबवित असते. येणाऱ्या काळामध्ये शेती, माती, कृषी सोबतच अन्य सर्व क्षेत्रांमध्ये शाश्वत विकासावर राज्य शासनाचा भर राहील ,असे प्रतिपादन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी केले.

नव्या सरकारच्या गठनानंतर योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर प्राधान्याने भर असून जिल्ह्यात आतापर्यत अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना 812 कोटींची मदत करण्यात आली आहे. शासनाच्यावतीने सामान्य जनतेच्या व शेतकऱ्यांच्या हिताच्या योजना प्राधान्याने राबविण्यावर भर देण्यात येणार असल्याची ग्वाही आज त्यांनी दिली.

महाराष्ट्र राज्याचा 66 वा स्थापना दिनानिमित्त आज नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते नांदेड येथील पोलीस कवायत मैदानावर ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी जिल्ह्यातील जनतेला त्यांनी संबोधित केले. यावेळी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, मनपाचे महेशकुमार डोईफोडे, अपर जिल्हाधिकारी पी. एस. बोरगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर अन्य वरिष्ठ अधिकारी आणि ज्येष्ठ सन्माननीय नागरिक तसेच स्वातंत्र सैनिक व त्यांचे कुटुंबियाची उपस्थिती होती.

जिल्ह्यात मूल्य शेती अभियान सुरू असून केळी निर्यात संदर्भात कृषी विभाग आणि जिल्हा उद्योग केंद्र कार्यरत आहे. रेशीम शेती, फुल शेतीबाबतही शासनातर्फे जिल्ह्यामध्ये लक्ष घातले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांची कोणतीही रक्कम शिल्लक राहणार नाही यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश त्यांनी महसूल विभागाला दिले. तसेच अग्रिस्टॅक योजनेमध्ये सर्व शेतकरी यांनी नोंदणी करावी. तसेच मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना 2.0 जिल्हयात राबविण्यात येत आहे. सौर ऊर्जा निर्मितीसाठी मोठ्या



प्रमाणात शासनाने सबसिडी जाहीर केली आहे. प्रत्येक नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री अतुल सावे यांनी केले.

जलसंधारणाच्या क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात कामे सुरू असून पाऊस पडेपर्यंत कामे पूर्ण करण्याबाबत त्यांनी संबंधित विभागांना सूचना दिल्या आहेत. जिल्ह्यात मुबलक पाणीसाठा उपलब्ध असला तरी नागरिकांनी पाण्याचा वापर जपून करावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. राज्य शासनाने सुरू केलेल्या जलयुक्त शिवार टप्पा-2 मध्ये जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात काम सुरु असुन त्यामध्ये शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे. जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वात "गाळमुक्त धरण व गाळयुक्त शेती" या अभियानालाही चांगला प्रतिसाद मिळत आहे. उन्हाळ्याचे हे दिवस असून संपूर्ण एक महिना आपल्या हातात आहे. जलसंधारणाच्या सर्व कामांना या काळात पूर्ण करावे, अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

अनेक वर्षापासून रखडलेल्या लेंडी प्रकल्पाचे काम वेगाने पूर्ण होत आहे. समृद्धी महामार्गाचे भूसंपादन जवळपास पूर्ण झाले आहे. याशिवाय नांदेड-वर्धा रेल्वे मार्गाचे भूसंपादन झाले आहे. शक्तिपीठ मार्गाच्या संदर्भातही स्थानिक लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांच्या मागण्यांना समजून घेऊन हा प्रकल्प पुढे नेण्यासाठी शासन वचनबद्ध असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले.

समृद्धी मार्गामुळे मराठवाडा आणि विदर्भाच्या अर्थकारणाला कलाटणी मिळणार असून त्यामुळे अशा मोठ्या प्रकल्पाला सकारात्मक दृष्टीने प्रतिसाद मिळावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. मात्र कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांचे नुकसान आम्ही होऊ देणार नाही याची ग्वाही त्यांनी दिली.

काही दिवसांपूर्वी नांदेड जिल्ह्यातील आलेगाव शिवारात ट्रॅक्टरची ट्रॉली विहिरीत पडल्यामुळे 7 शेतमजूर महिलांचा मृत्यू तर 3 शेतमजूर जखमी झाले होते.या दुर्घटनेचा त्यांनी आपल्या भाषणात उल्लेख केला तसेच या दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहायता निधीतून 5 लाख रुपयांचे अर्थसाहाय्य दिले असल्याची माहिती पालकमंत्री अतुल सावे यांनी दिली.

शंभर दिवसांच्या शासकीय कामकाज सुधारणा कृती आराखड्यामध्ये नांदेड जिल्हा प्रशासनाने मराठवाडा विभागात पहिला क्रमांक व पोलीस उपमहानिरीक्षक नांदेड कार्यालयाने पहिल्या तीनमध्ये क्रमांक मिळविल्यामुळे त्यांनी जिल्हा प्रशासनाचे अभिनंदन केले. जिल्हाधिकारी कार्यालय व पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालय नांदेड यांचे कार्यालय ई-ऑफिस करण्यात आले आहे. सर्व शासकीय कार्यालयात ई-फाईल्सचा वापर हळूहळु अनिवार्य केला जाणार असल्याची माहिती पालकमंत्री अतुल सावे यांनी दिली.

जिल्हा पोलीस दलाच्या बँड पथकाने राष्ट्रगीतासह राज्यगीत सादर केले. यावेळी राष्ट्रध्वजास मानवंदना व राष्ट्रगीता नंतर पालकमंत्री अतुल सावे यांनी संचलन करणाऱ्या पथकाचे पोलीस वाहनातून निरीक्षक केले. परेड कमांडर डॉ. आश्विनी जगताप, सेंकड इन कमांडर विजय कुमार धोंडगे यांच्या नेतृत्वाखाली पथसंचलनात केंद्रीय राखीव पोलीस दल, जलद प्रतिसाद दल, दंगा नियंत्रण पथक, सशस्त्र पोलीस पथक, सशस्त्र महिला पोलीस पथक, गृहरक्षक दलाचे पुरूष व महिला पथक, राष्ट्रीय छात्रसेना, अग्नीशमन दलाचे पथक, पोलीस बॅन्ड पथक, डॉग स्काड, मार्क्स मॅन वाहन, बॉम्ब शोधक व नाशक पथक, दंगा नियंत्रक वाहन, वज्र वाहन, अग्निशामक वाहन देवदूत यांचा पथसंचलनात सहभाग होता.

यावेळी पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते क्षेत्रीय शासकीय/निमशासकीय कार्यालयासाठी शंभर दिवसांचा कृती आराखडा अंतर्गत कार्यालयीन सुधारणा विभागस्तरावर पोलीस विभागात प्रथम क्रमांक विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप तर विभागस्तरावर महसूल विभागात प्रथम क्रमांक मिळल्याबद्दल राहुल कर्डिले यांना त्याचबरोबर राजीव गांधी गतीमानता (प्रगती) अभियान स्पर्धा पारितोषक 2024-25 साठी दुसरा क्रमांक कर्मचारी बदल्या ऑनलाईन पोर्टल मार्फत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांना प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

सन 2024 साठी पोलीस महासंचालक यांच्याकडून सन्मानचिन्ह प्राप्त सोनखेड पोलीस स्टेशनचे सहा. पो. नि.पांडुरंग माने, नांदेड स्थानिक गुन्हे शाखेचे पो.उप. नि.साईनाथ पुयड, देगलूर पोलीस स्टेशनचे पो.हे.कॉ. किरण कुलकर्णी, उस्माननगर पोलीस स्टेशनचे सुशील कुबडे, वजिराबाद पोलीस स्टेशनचे गजानन कदम, नागरी हक्क संरक्षण विभागातील व्यंकट शिंदे, कुंडलवाडी पोलीस स्टेशनचे पो.उप. नि.गजेंद्र मांजरमकर, गुन्हे अन्वेषन विभागाचे पो.हे.कॉ. विनायक किरतने, लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे चंद्रकांत पाटील, सद्या पिंपरी चिंचवड पो. आयुक्तालयातील सुधीर खोडवे यांचा सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

विभागीय आयुक्त कार्यालयाकडून निवड झालेला आदर्श तलाठी पुरस्कार प्राप्त नायगाव तालुक्यातील कुंटूर येथील तलाठी गोविंद काळे यांचा 5 हजार रुपये धनादेश व प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. क्रीडा विभागामार्फत श्री शिवछत्रपती पुरस्कार सन 2022-24 प्राप्त आंतरराष्ट्रीय बॉक्सींग खेळाडू अजय पेंदोर, पॅरा ऑलम्पिक आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन खेळाडू म्हणून लताताई उमरेकर यांचा सत्कार तर युवा पुरस्कार सन 2024-25 संदीप कळासरे यांना पर्यावरण संरक्षण, वृक्षारोपण, नदी स्वच्छता, पथनाट्य सादरीकरण, बालविवाह प्रतिबंध पशुपक्षी संरक्षण आदी कार्याबद्दल 10 हजार रुपये व सन्मानचिन्हे देऊन सत्कार करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रविंद्र पांडागळे व श्रीमती अंजली नातु यांनी केले.

तत्पूर्वी महाराष्ट्र राज्याचा 66 वा स्थापना दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी झेंडावंदन करण्यात आले. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांसह सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# एकमेका साथ देऊ,अवघे धरु सुपंथ

समूहजीवनाची गरज आपणा सर्वाना आहे. आपल्या आजूबाजूला मित्र-मैत्रिणी व इतर लोक नसतील, तर आपण कोणाशी बोलणार ? आपला आनंद,अडी-अडचणी कोणाला सांगणार ? माणसांना समूहात राहायला आवडते. आपल्या कुटुंबात, शेजा-यामध्ये आणि आजूबाजूच्या माणसांच्या सहवासात राहणे म्हणजे समूहात राहणे होय. समूहात आपल्याला सोबत मिळते. सोबतीमुझे आपल्याला सुरक्षित वाटते. आपण एकमेकांना मदत करू शकतो. एकमेकांना मदत करणे म्हणजे सहकार्य. समूहात राहिल्याने आपल्याला इतरांची मदत होते. परस्पर सहकार्य हा समूहजीवनाचा सर्वात मोठा फायदा आहे. काही वेळेस आपल्या नातलगांपेक्षा ही समूहात जोडलेली माणसे जिवाभावाची वाटतात.नकळत त्यांच्याशी आपुलकीचे बंध जुळले जातात. असे सहकार्य निर्माण होण्यासाठी नियमांची आवश्यकता असते. अशा प्रकारचे वेगवेगळे समूह माणूस बनवतो काही विशिष्ठ कारणांसाठी, जसे कौटुंबिक समूह,सामाजिक समूह,साहित्यिक समूह




वगैरे वगैरे....!! या समूहाला एकत्रितपणे घेऊन सकारात्मक दृष्टिकोण ठेवत सर्वांगीण विकास साधणे म्हणजेच नेतृत्व करणे होय. याकरिता अहंकार बाजूला ठेऊन सर्वांसाठी समान उद्दिष्ट ठेवून नियोजनबद्ध समाजसेवा करावी लागते.सहकार्याची भावना तिथे दिसून येते स्वतःपेक्षा समूहाला विषेष महत्व दिल्यामुळे ते परस्परांवर अवलंबून असतात कोणत्याही प्रसंगात ते एकत्रित असतात.त्यासाठी वरिष्ठांच्या मताने ,त्यांच्या सूचनेप्रमाणे ऐकावे ही गोष्ट कार्यकर्त्यांना कमीपणाची वाटता कामा नये. कारण ह्या समूहात काम करणे ही सुद्धा एक समाजसेवाच आहे आणि ती निःस्वार्थी पणे करावी. एकमेका साथ देऊ,अवघे धरु सुपंथ हाच मंत्र मनात ठेवून प्रत्येकाने आपले कार्य करावे आणि समुहाचे उद्दिष्ट सफल करावे....!!

हिरकणी सौ.अनिता गुजर
डोंबिवली
८०९७५२४१९७

# बीड जिल्ह्याच्या विकासाला शासनाचे प्रधान्य -इंद्रनील नाईक

## दिमारवदार सोहळ्यात महाराष्ट्र दिन साजरा

बीड, दि. 1 (जि.मा.का.) : बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला शासनाने प्राधान्य दिले आहे. येथील साधन सुविधांचा विकास करून विकसित जिल्हा अशी बीड जिल्ह्याची नवी ओळख घडवून यात नागरिकांनाही योगदान द्यावे, असे प्रतिपादन राज्याचे उद्योग व सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी महाराष्ट्र दिनी केले.

बीड येथील मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा आज श्री नाईक यांच्या हस्ते येथील पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर पार पडला त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांची प्रमुख उपस्थिती होती.

संयुक्त महाराष्ट्र लढयात प्राणांचे बलिदान देणा-या 105 हुतात्म्यांसोबतच पहेलगाम येथे अतिरेकी हल्यात प्राण गेलेल्या नागरिकांना आपल्या भाषणात त्यांनी आरंभी श्रध्दांजली अर्पण केली.

राज्यात गुंतवणुकीस पोषक वातावरण निर्माण करून उद्योग व्यवसायांची वाढ करण्याचे धोरण स्वीकारल्याने कला, क्रीडा, संस्कृती, साहित्य यासोबतच राज्य उद्योगातही अग्रणी ठरले आहे. याबद्दल श्री नाईक यांनी यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचे आभार आरंभी व्यक्त केले.

उपमुख्यमंत्री श्री अजित पवार यांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्रीपद स्वीकारल्यानंतर येथे विकासाला चालना मिळेल या पद्धतीने काम सुरू केले आहे. जिल्हा मुख्यालयात मूलभूत सुविधांचा विकास करण्यासोबतच विमानतळ उभारण्याची घोषणा केली आणि या कामाला गती दिली यामुळे आता बीड जिल्हा विकासासाठी सज्ज झाला असल्याचे श्री नाईक यांनी सांगितले.

या ठिकाणी रोजगार आणि स्वयंरोजगार यासाठी टाटा टेक्नॉलॉजीच्या सहकार्याने एक अद्यावत असे इन्सुवेशन सेंटर उभारण्यात येणार आहे. यात 191 कोटींचा खर्च आहे त्यातील 163 कोटी सदर कंपनी गुंतवणार असून उर्वरित वाटा उद्योग विभागाचा असेल असे सांगून श्री नाईक म्हणाले की, जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या गुंतवणूक परिषदेत 930 कोटी रुपयांचे सामंजस्य करार झाले आहेत याचा या खात्याचा राज्यमंत्री या नात्याने मला आनंद आहे.

आद्यकवी मुकुंदराज यांचा हा जिल्हा आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा नुकताच प्राप्त झाला आहे यासाठी पुढचं पाऊल म्हणून अंबाजोगाईला पुस्तकाचे गाव, म्हणून शासनाने घोषित केले आहे. यामुळे साहित्य, नाट्य तसेच चित्रपट क्षेत्रात असणारी बीड जिल्ह्याची ओळख उजळून निघणार आहे असे ते म्हणाले.

लाडकी बहीण योजना राबवताना महिलांना बस प्रवास सवलत, ज्येष्ठांना बस प्रवास सवलत तसेच महात्मा ज्योतिराव फुले आरोग्य योजनेअंतर्गत राज्यात कोणतीही उत्पन्नाची अट न घालता 12 कोटी जनतेला 5 लाखापर्यंतचे मोफत वैद्यकीय उपचार आदी माध्यमातून शासन विविध योजना राबवत आहे. शेतकऱ्यांना पिक विमा, विज बिल माफी यासह सौर शेतीपंप आदी माध्यमातून सहाय्य करणे सुरू आहे. याचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

ध्वजारोहणानंतर पोलीस दलाचे शानदार संचालन झाले. पोलीस, होमगार्ड, अग्निशामक दल यांच्या पथकाने यावेळी मानवंदना दिली त्यानंतर विविध क्षेत्रातील पुरस्कार विजेते आणि जिल्हा क्रीडा पुरस्कार विजेते यांचा मंत्रिमहोदयाच्या हस्ते गौरव करण्यात आला.

# कांदिवली भाजपा वार्ड क्रमांक 20 च्या वतीने महाराष्ट्र दिन मोठ्या जल्लोषात संपन्न.



भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम कांदिवली भाजपा वार्ड क्रमांक २० च्या वतीने महाराष्ट्र दिन मोठ्या जल्लोषात उत्साहात साजरा करण्यात आला.गुरुवार दिनांक १ में २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजता पूर्व मंडळ अध्यक्ष व पूर्व नगरसेवक बाळा तावडे यांच्या कार्यालया समोरील चौका मध्ये महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन विविध कार्यक्रमांसह पार पडला.यावेळी कांदिवली येथील भाजपाच्या नवनिर्वाचित पुरुष व महिला पदाधिकारी यांचे सत्कार करण्यात आले.तर मुंबई कांदिवली पश्चिम येथील जेष्ठ पत्रकार साहित्यिक गीतकार सामाजिक कार्यकर्ते भारत कवितके यांचा यावेळी पूर्व मंडळ अध्यक्ष व पूर्व नगरसेवक बाळा तावडे महामंत्री योगेश पडवळ डहाणूकर वाडी मंडळ अध्यक्ष प्रमोद घाग या मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना या वेळी श्रद्धांजली वाहण्यात आली.याप्रसंगी बाळा तावडे यांनी महाराष्ट्र दिनाच्या व कामगार दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा देऊन महाराष्ट्र चळवळ बाबतीत माहिती दिली.छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.छत्रपती शिवाजी महाराज यांची आरती करण्यात आली, स्फूर्तिदायक महाराष्ट्र गीत होऊन विविध घोषणांनी परिसर दणाणून गेला.याप्रसंगी संजय सिंह, योगेश पडवळ, बाळा तावडे, प्रमोद घाग यांनी महाराष्ट्र दिन व कामगार दिन या विषयावर मार्गदर्शन केले.या प्रसंगी बाळा तावडे, संजय सिंह, योगेश पडवळ, प्रमोद घाग, संतोष जाधव,आर.एस.वर्मा, भारत कवितके,हरिशंकर गिरी, चंद्रकांत सुर्वे, सागर जाधव,सुलभा जोशी,रेश्मा टक्के, रुपाली चाळके, तन्वी अमृते, आणि इतर भाजपा चे पुरुष व महिला पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते\

# झोप समाधानाची

अरे माणसा तुझी भूक किती पोट केवढ त्याला किती लागत याचा कधी विचार तर करायला तुला वेळ आहे का ? का तुला भस्म्या जडलाय . होय खरच माणसाला लोभ नावाचा भस्म्याच जडलाय .माणूस धावतोय धावतोय विनाकारण धावतोय पैशाच्या मागे; त्याला थांबायचे कुठे हेही कळेना. पैशाची आगगाडी त्याची संपता संपेना गरजा वाढत चालल्या पूर्वी थोडक्या पैशात समाधानी असलेला माणूस आज मात्र हव्यासापायी पैशाच्या गादीवर झोपूनसुद्धा त्याला शांत समाधानाची झोप लागत नाही. जी की पहिली जमिनीच्या अंथरूण आभाळाच पांघरूण तिथे सुद्धा छान झोप लागायची प्रत्येकाला जीवनाच्या स्पर्धेत सतत टिकून राहण्यासाठी स्वतःला सिद्ध करायचा असत त्याचा परिणाम म्हणजे स्ट्रेस नावाचा राक्षस जन्माला येतो व त्याला त्रास देतो त्याच्याशी निगडित प्रकारचे आजार माणसाला होतात मग स्वास्थ्य बिघडत ते स्वास्थ्य मिळवण्यासाठी मग नाना प्रयोग केले जातात . तेही फेल जातात. गरज असेल तेवढच कमवाव पैशाच्या मागे पळून आरोग्य गमवण्याचे घातक कृत्य करु नये

## 31 वे अ.भा. म. न. साहित्य संमेलनाच्या कवी संमेलन अध्यक्षपदी डॉ लक्ष्मण हेंबाडे यांची निवड



प्रतिनिधी- जगदीप वनशिव कराड- येथे अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद पुणे इंद्रधनु विचार फाउंडेशन कराड यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित केलेल्या 31व्या अखिल भारतीय मराठी नवोदित साहित्य संमेलनाच्या कवी संमेलन अध्यक्षपदी माणदेश कविवर्य डॉ. लक्ष्मण हेंबाडे यांची निवड करण्यात आली तसेच साहित्य संमेलनाचे उद्घाटन मा शरदचंद्र पवार ( माजी केंद्रीय कृषिमंत्री )साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रवीण गायकवाड (सुप्रसिद्ध साहित्यिक )माननीय श्रीनिवास पाटील (माजी राज्यपाल सिक्कीम )माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण हे प्रमुख मान्यवर उपस्थित राहणार आहेत अशी माहिती संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे यांनी दिली प्रमुख पाहुणे म्हणून सागर काकडे किशोर टिळेकर विनोद अष्टुळ विद्या अटक सुवर्णा पवार अनिल खंदारे अमोल कुंभार परमेश्वर पालकर फुलचंद नागटिळक हजर राहणार असून महाराष्ट्रातील नामवंत कवी लेखक उपस्थिती राहणार आहे कवी संमेलन परिसंवाद चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे मे २ ०२५ रोजी ९ व १० या दोन दिवसीय साहित्य संमेलनात महाराष्ट्रातील साहित्यिक सहभागी होणार आहे कराड येथील महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण साहित्य नगरीत यशवंतराव स्मृती सदन ( टाऊन हॉल ) कराड जिल्हा सातारा येथे संपन्न होणार आहे

## आभाळाचा सातबारा ..



चाटुर महिषासुराच्या रक्ताची धार आजुन ताज्या बहिष्कृत
रणागणाची शोभा वाढवत ...
तेजोमय पहाटेचे स्वप्न उराशी धरून , आपल्या तलवारीच्या जोरावर
धारधार वार करत ....
कुठल्या पाठीला भोकं पडायची सराव करत आहे ...
रोज उठावे अन् बोंब मारत सुटावे ..
हलक्या झालेल्या मुळाशी जाऊन ,
देशील का माय सावलीचे दान ,
घट्ट आवळून रक्ताची बाड आपल्याच मातीत मिसळून ...
भिडत जावे नदी नाल्याशी जीवदान मिळावे म्हणून ...
घ्यावे पुण्य पदरात तुझ्यात नहाले म्हणून ....
पदरात तुला लपून ऊन वारा का? जाणार आहे रुसून ...
द्यावी धूप काळजाची , हाक द्यावी काळया सवल्याना , बोलावे
सारे गंध , उराशी गारवा देणारे ,
बेखड बेवारस मुर्त्या , भयानक खाणीत मृत पडल्या आहेत .
तेव्हा घ्यावे धरणीला पाठीला आन आपल्याच आकाशाचा सातबारा
नावे करावा ...
उडावे शोध घेत , आपल्याच पाऊल खुणा सोडत ...
परतीला घरट्यात ,
जीव मुठीत घेऊन...

**कवयित्री ललित लेखक**
**मंगल वाघमारे पोस्ते**
**औरंगाबाद .**
**9822891921**

# प्रधानमंत्री आवास योजनेच्या सेल्फ सर्व्हेसाठी मुदतवाढ

## १५ मे पर्यंत सर्व्हे करून घेण्याचे आ.संदीप क्षीरसागरांकडून आवाहन



बीड । प्रतिनिधी पात्र असलेल्या नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत नव्याने घरकूल मिळणार असून. त्याकरिताऑनलाईन सेल्फ सर्व्हे करण्याचा अंतिम दिनांक ३० एप्रिल २०२५ होता. त्याला आता १५ दिवसांची मुदतवाढ मिळाली असून १५ मे २०२५ पर्यंत नागरिकांना मोबाईल पद्धारे सेल्फ सर्व्हे करता येणार आहे. त्यामुळे बीड मतदारसंघ क्षेत्रातील बीड व शिरूर कासार तालुक्यातील ज्या नागरिकांचे सेल्फ सर्व्हे करणे बाकी आहे अशा निकषपात्र नागरिकांनी आपल्या मोबाइलद्वारे किंवा आपल्या ग्रामसेवकामार्फत १५ मे पर्यंत सेल्फ सर्व्हे करून घ्या असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे. प्रधानमंत्री आवास योजनेत समाविष्ट होण्यासाठी सध्या सद्या सेल्फ सर्व्हे करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यामध्ये आपली नोंदणी करण्यासाठी ग्रामपंचायत अधिकारी/ ग्रामसेवक यांचे मार्फत किंवा आपण स्वतः सेल्फ सर्व्हे करून आपली नोंदणी करू शकता. निकषांचे पालन करून कच्चे घर असणाऱ्यांनी प्रधानमंत्री आवास योजनेसाठी सेल्फ सर्व्हे करून आपली नोंदणी करून घ्यावी, नोंदणी करण्यासाठी १५ दिवसांची मुदतवाढ मिळालेली आहे. १५ मे ही शेवटची तारीख असून त्या अगोदरच बीड मतदारसंघातील पात्र नागरिकांनी आपली नोंदणी करुन घ्यावी असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडून करण्यात आले आहे.

## महिलांसाठी आत्मविकास शिबीराचे आयोजन

ठाणे (प्रतिनिधी) महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि जीवनातील अडचणींवर आध्यात्मिक मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने एकदिवसीय आत्मविकास शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. "चला... शोधूया आपल्या समस्यांवर उपाय" या संकल्पनेतून होणाऱ्या या शिबिरात ताण व्यवस्थापन आणि वेळेचे नियोजन यावर विशेष मार्गदर्शन दिले जाणार आहे. शिबिरातील "प्रश्न तुमचे, उत्तरे स्वामींची" या सत्रात सहभागी महिलांना त्यांच्या मनातील प्रश्न विचारण्याची संधी मिळणार असून, उत्तरे श्री स्वामी समर्थांच्या विचारसरणीवर आधारित असतील. या शिबिराचे मार्गदर्शन ह.भ.प. प्रज्ञाताई पंडित करणार आहेत. शिबिरात सहभागी होण्यासाठी ९३२०४४१११६ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आयोजकांनी कळवले आहे.

# भिमराव ढाण्या वाघ या भिम गीताचा लोकार्पण सोहळा संपन्न



प्रतिनिधी - जगदीप वनशिव पुणे - भारतरत्न डॉ . बाबासाहेब आंबेडकर म्हणजे आपल्या भारतदेशाच्या विद्येचे वैभव . शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा या महामंत्राचे जनक . या दोन्ही गोष्टी लक्षात घेऊन कवी सीताराम नरके यांनी केलेली गीत रचना आणि या रचनेला मुंबईचे गायक राजन गिरकर यांनी मराठी चित्रपट गीताच्या चालीत अतिशय बेमालूनपणे गायले आहे . हे गीत भारतीयांच्या पंसतीस उतरेल याची मला शंभर टक्के खात्री आहे . असे उदगार सुप्रसिद्ध उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते मा आबासाहेब रासकर यांनी काढले . रिजेन्ट हॉटेल पुणे येथे " भिमराव ढाण्या वाघ "या गीताच्या लोकार्पण सोहळ्यात ते बोलत होते . महामानव डॉ . बाबासाहेब आंबेडकर हे महात्मा ज्योतिबा फुले यांना आपले गुरु मानत आणि महत्मा फुले हे छत्रपती शिवाजी महाराज यांना आपले गुरु मानत होते ही समविचारांची साखळीच बहुजण समाजाला आपली वाटते . हेच आपलेपण मी गीतात गुंफण्याचा प्रयत्न केला आहे असे विचार कवी गीतकार सीताराम नरके यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले .कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ .चारदत्त नरके यांनी केले तर आभार मंच्छिद्र नरके यानी मानले या प्रसंगी कवी चंद्रकांत जोगदंड सिने अभिनेते कवी जनाबापू पुणेकर बालकवी युगंधर नरके कवी छगन वाघचोरे निवेदक रानकवी जगदीप वनशिव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते पुणे येथील रिजेंट हॉटेलमध्ये डॉ .बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीचे औचित्य साधून राष्ट्रपती पोलीस पदक मानकरी गीतकार सीताराम नरके यांच्या ११ व्या गीताचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला .

# नेताजी सुभाष विद्यालय,मानवत येथील इयत्ता दहावी बॅच 2002 तर्फे शाळेस मदतीचा हात.



असं म्हणतात आई-वडिलांच्या आणि शाळेच्या ऋणातून कधीच मुक्त होता येत नाही कारण जीवन जगण्याच्या शर्यतीत अनेक चढ-उतार पार करण्याचे सामर्थ्य आई वडील देतात आणि शिक्षणाच्या बळावर आकाशाला गवसणी घालण्याचे कौशल्य शाळा देत असते. शाळेचे उपकार फेडणे शक्य जरी नसले तरीही एक छोटासा प्रयत्न म्हणून मानवत येथील नेताजी सुभाष माध्यमिक विद्यालयातील शैक्षणिक वर्ष २००२ मध्ये दहावी उत्तीर्ण करून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांनी शाळेतील विज्ञान प्रयोगशाळा नूतनीकरणासाठी मदतीचा हात पुढे करून आदर्श ठेवला आहे. १ मे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधत सर्व वर्गमित्रांनी एकत्र येऊन मानवीय अवयवांची प्रतिकृती,कृत्रिम मानवीय सापळा,प्रयोगास लागणारी विविध रसायने,मायक्रोस्कोप,जगाचा नकाशा आणि इतर वस्तू असे ७०,०००/- किमतीचे प्रयोगशाळा साहित्य शाळेस सुपूर्द केले याप्रसंगी शाळेतील शिक्षक वर्ग आणि ने.सु. वि. २००२ बॅचचे विद्यार्थी आणि विद्यार्थिनी उपस्थित होते. "शाळेला समाजाचा आधार लागतो आणि समाजाला शाळेचा अभिमान असावा ह्या दोन्ही गोष्टी तुमच्या एका कृतीतून साध्य झाल्या" असे म्हणत विद्यार्थ्यांच्या शाळेबद्दल असणाऱ्या जाणीव आणि प्रेमाबद्दल सर्व शिक्षक वृंदांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले या छोटेखानी कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून श्री.डॉक्टर डोंबरे सर,सूत्र संचालन श्री. होगे सर आणि अध्यक्षीय समारोप मुख्याध्यापक श्री. संजय लाड सरांनी केले.

# लेखिका,कवयित्री सौ.प्रतिमा काळे लिखित कर्मयोगिनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या पुस्तकाचे प्रकाशन.



पुणे:-ऑटो क्लस्टर सभागृह, चिंचवड,पुणे, येथे मंगळवार दिनांक २९ एप्रिल २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय कामगार दिन आणि महाराष्ट्र राज्याच्या स्थापना दिनानिमित्त नारायण सुर्वे साहित्य कला अकादमी आयोजित तेहतिसाव्या श्रमउद्योग परिषदेत विविध पुरस्कार प्रदान सोहळा कार्यक्रमात प्रा.डॉ.राजा दीक्षित,मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे माजी अध्यक्ष यांच्या हस्ते विविध पुरस्कार प्रदान करण्यात आले. तसेच ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा.डॉ.श्रीपाल सबनीस यांनी परिषदेचे उद्घाटन केले.अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या प्रमुख कार्यवाह डॉ. सुनीताराजे पवार अध्यक्षस्थानी होत्या;तसेच नारायण सुर्वे साहित्य कला अकादमीचे अध्यक्ष सुदाम भोरे, पुरुषोत्तम सदाफुले प्रमुख उपस्थित होते.याप्रसंगी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ,मुंबईचे कल्याण आयुक्त रविराज इळवे यांना 'पद्मश्री नारायण सुर्वे जीवनसाधना सन्मान' देवून सन्मानित करण्यात आले.'मास्तरांची सावली कृष्णाबाई नारायण सुर्वे सन्मान' कविवर्य माधव पवार यांच्या सहधर्मचारिणी चारुलता माधव पवार यांना प्रदान करण्यात आला.कष्टकरी महासंघ या संघटनेचे अध्यक्ष काशिनाथ नखाते यांना 'नारायण मेघाजी लोखंडे स्मृती कष्टकरी हितसंवर्धन संघटना पुरस्कार'; माणिकराव ढोकले यांना 'यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र उद्योगभूषण पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले.पुरुषोत्तम सदाफुले मामांनी पुरस्कार निवडीबाबत भूमिका मांडली.पुरस्कार विजेत्या पैकी काही विजेत्यांची प्रकट मुलाखत घेतली.डॉ. सुनीताराजे पवार यांनी 'जगातील सर्वोत्तम गोष्टी कामगारांच्या कष्टांतून निर्माण झालेल्या आहेत.अर्धे जग महिलांनी व्यापले असून विषमतेची दरी कमी करून त्यांचा मान राखला जावा अशी अपेक्षा व्यक्त केली.बाजीराव सातपुते यांनी 'एकटाच आलो नाही,युगाचीही साथ आहे' या व्याख्यानातून नारायण मेघाजी लोखंडे आणि नारायण सुर्वे यांचा जीवनपट मांडला. या भव्यदिव्य सोहळ्यात सर्व मान्यवरांच्या हस्ते त्रिशताब्दी जन्मोत्सव निमित्त,सर्व लहान मोठ्या वयाच्या विद्यार्थ्यांसाठी,संपूर्ण मानवांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन चरित्राची ओळख व्हावी यासाठी सौ.प्रतिमा काळे लिखित "कर्मयोगिनी अहिल्यादेवी होळकर" या पुस्तकाचे प्रकाशन झाले.यातून सर्व सामान्य जनतेपर्यंत अहिल्यादेवींच्या कार्याची बहुमोल माहिती पोहचेल.किती तरी दुःख भोगले तरी निराश न होता,जनतेच्या भविष्यासाठी अहोरात्र त्या लढा देत राहिल्या,आपल्या सासऱ्यांना दिलेल्या शब्दाचे प्रामाणिकपणे पालन केले. या हेतूने निर्मिलेल्या पुस्तकाचे कार्यक्रमा दरम्यान प्रकाशन करण्यात आले.सर्वांच्या घरी या पुस्तकाचे पारायणे व्हावीत,जेणे करून पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी जे जे कार्य केले त्याची ओळख या निमित्ताने होईल.प्रत्येक घरी हे पुस्तक पोहचले पाहिजे,असा मानस लेखिका,कवयित्री सौ.प्रतिमा काळे यांचा आहे.

# डी.बी.ए.चे 29 वे राज्यस्तरीय कविसंमेलन चंद्रपूर मध्ये उत्साहात संपन्न

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्य करणाऱ्या डी.बी.ए.अर्थातच डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्यिक विचारमंच महाराष्ट्र रत्नागिरी भारत रजि. या साहित्यिक संस्थेच्या वतीने डी.बी.ए. चंद्रपूर जिल्हा कार्याकारिणीचा चौथा वर्धापन दिन, व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त चंद्रपूर व गडचिरोली जिल्हा कमिटीच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा व राज्यस्तरीय कविसंमेलन चंद्रपूर या ठिकाणी नागपूर विभागीय अध्यक्ष व जेष्ठ कवी व पत्रकार मा.सोपानदेव मशाखेत्री कार्यक्रमाध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या थाटात संपन्न झाले. उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते महामानवांच्या प्रतिमेला दीपप्रज्वलन, पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. मंचावरील सर्व पाहुण्यांचे स्वागत संविधान उद्देशिका, मानाचा पट्टा देऊन करण्यात आले. त्यानंतर डी. बी. ए. चे ऊर्जागीत भावना खोब्रागडे संस्थापिका व संपादिका यांनी सादर केले. कोरोना पासून सुरु झालेला हा डी. बी. ए. चा प्रवास आजही तेवढ्याच ताकदीने समोर नेण्याचे काम आम्ही सर्व करत आहोत. आणि पुढेही करत राहू. आणखीही बऱ्याच गोष्टीवर प्रकाश टाकत कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. प्रशांत खैरे सर चंद्रपूर जिल्हा सचिव यांनी केले. यानंतर मंचावर उपस्थित मनोज जाधव सर संस्थापक अध्यक्ष, यांनी आपल्या मनोगतात डी. बी. ए. ची वाटचाल आजपर्यंत झालेल्या कामकाजचा लेखाजोखा मांडला. यानंतर ॲड. बांबोळे यांनी सुद्धा आंबेडकरी चळवळीवर भाष्य केले. आणि काही साहित्यिकांना त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक कार्याबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय पुरस्कार, मानपत्र, मानाचा पट्टा आणि सन्मानचिन्ह देऊन सर्व मान्यवरांच्या हस्ते त्यांना प्रदान करण्यात आला. यानंतर संघमित्रा गेडाम मॅडम नागपूर विभागीय उपाध्यक्षा यांच्या संकल्पनेतून साकार झालेले बाबू हरदास एल. एन. यांच्या जीवन पटावर आधारित बाबू हरदास एल. एन.





यांचा क्रांतीघोष जयभीम हा प्रातिनिधिक काव्यसंग्रह सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशित करण्यात आला. यां काव्यसंग्रहावर प्रा. डॉ. आशिष थूल यांनी भाष्य केले. त्यात जयभीम हा शब्दाची निर्मिती आणि त्याचा इतिहास थोडक्यात मांडला. सोबतच संध्या खरतडे यवतमाळ जिल्हाध्यक्षा, ॲड. पि. डी. काटकर, सुजाता मेश्राम मॅडम, गजानन माद्यस्वार यांनी थोडक्यात आपले मनोगत व्यक्त केले. भीमपर्व दिनदर्शिका - २०२५ याठिकाणी सर्वांना देण्यात आली. यावेळी सर्वत्र वातावरण मंगलमय होते. यानंतर पहिल्या सत्राचे अध्यक्षीय भाषण यां कार्यक्रमाचे अध्यक्ष आदरणीय सोपानदेव मशाखेत्री नागपूर विभागीय अध्यक्ष यांनी आपल्या पहाडी आणि सौम्य आवाजात साहित्यिकांना मोलाचे मार्गदर्शन केले. महाराष्ट्रातील तमाम साहित्यिक याठिकाणी उपस्थित होते. लगेचच सर्व साहित्यिकांनी जेवणाचा मनमुराद आस्वाद घेतला. काही क्षणातच कविसंमेलनाला सुरुवात झाली. आणि एकापेक्षा एक दर्जेदार रचना कविमनावर छाप पाडू लागल्या.... यवतमाळ, गोंदिया, वर्धा, रत्नागिरी, बुलढाणा, भंडारा वाशिम, अकोला, नागपूर, गडचिरोली, चंद्रपूर इत्यादी जिल्ह्यातूनचा कवीवर्ग यां कविसंमेलनाला उपस्थित होता. सर्वांनी यां कार्यक्रमाचा भरभरून आनंद लुटला. सदर कविसंमेलन प्रिती जीवने मॅडम (भंडारा) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. यां संपूर्ण कार्यक्रमाचा आत्मा म्हणजे सूत्रसंचालन हे रवी ताकसांडे चंद्रपूर जिल्हा उपाध्यक्ष तसेच प्रभाकर दुर्गे गडचिरोली जिल्हा सचिव यां दोन्ही निवेदकांनी आत्मसमर्पित होऊन सांभाळला. अगदीच सुरुवातीपासून ते सरते शेवटी पर्यंत मोलाची आणि महत्वाची कामगिरी बजावणारे आपल्या डी. बी. ए. चे गडचिरोली जिल्हा सचिव प्रभाकर दुर्गे सर यांचे कष्ट अपार ठरले. तसेच अपेक्षा खोब्रागडे चंद्रपूर जिल्हा ग्राफिक्सकार, हिचे सुद्धा खूप सहकार्य लाभले. सुमन चव्हाण मॅडम गडचिरोली सहसचिव, संगीता दुधे मॅडम गडचिरोली जिल्हा संघटक,प्रा.प्रशांत खैरे सचिव,छाया जांभुळे चंद्रपूर जिल्हा कार्याध्यक्षा, सुजाता मेश्राम आणि उपस्थिती सर्व साहित्यिकांच्या सहकार्यातून हे संमेलन यशस्वी झाले.

## डॉ गणेश पुंडे राज्यस्तरीय युवा आयडॉल पुरस्काराने सन्मानित



प्रतिनिधी - जगदीप वनशिव पुणे - राष्ट्रीय लोकराज्य न्यूज मिडिया समूह आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यामध्ये लातूर जिल्ह्यातील ग्रामीण कवी डॉ गणेश तुकाराम पुंडे यांना यावर्षीचा राज्यस्तरीय युवा आयडॉल पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आला. या पुरस्कार सोहळ्याला अभिनेते महेश देवकते, सिनेअभिनेत्री मा निलोफर पठाण सिनेअभिनेत्री प्राची पालवे, प्रांजली पवार तसेच राष्ट्रीय लोकराज्य नूज मिडिया समूहाचे संपादक संयोजक मा राहुल कुदनर यांच्या समवेत महाराष्ट्रातील नामांकित मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रातील 34 व्यक्तिमत्वाना राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी डॉ गणेश पुंडे यांच्या सामाजिक साहित्यिक कार्याची दखल घेऊन त्यांना युवा आयडॉल पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ गणेश पुंडे यांच्या कार्याची दखल आज पर्यंत विविध संस्था संघटना यांनी घेतली आहे. गणेश पुंडे यांना आतापर्यंत मानद डी लिट सह दोन मानद डॉक्टरेट अवॉर्ड याबरोबरच विविध राज्यस्तरीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.शून्य से शिखर तक अंतर्गत दिला जाणारा विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सन्मान, राष्ट्रीय गौरव रत्न पुरस्कार, राष्ट्रीय पद्मागौरव पुरस्कार, राष्ट्रीय साहित्य भूषण पुरस्कार, इंडियन आयकॉन पुरस्कार, साहित्य रत्न पुरस्कार, साहित्य सेवा पुरस्कार, साहित्य साधना पुरस्कार,आंतरराष्ट्रीय छंदोगामात्या पुरस्कार, सुजन भारत पुरस्कार,अशा अनेक पुरस्काराने सन्मानित गणेश पुंडे यांनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात सलग तीन वेळा सहभाग नोंदवला आहे. विविध चॅनेल्स रेडिओ ने त्याच्या काव्याची दखल घेतली आहे. विविध वर्तमान पत्रात तथा प्रतिनिधिक काव्यासंग्रहात त्यांच्या कविता, लेख प्रकाशित झालेले आहेत.भारतीय पोस्ट खात्याने त्यांच्या नावाने दोन पोस्टल तिकीट काढून अनोखा सन्मान केला आहे. जागतिक संसदेने गणेश पुंडे यांना जागतिक संसदेचे सदस्यत्व बहाल केले आहे. राजेश दिवटे लिखित झिरो ते हिरो या प्रेरणादायी ग्रंथात गणेश पुंडे यांचा जीवन परिचय प्रकाशित करण्यात आला आहे. एक प्रेरणादायी व्यक्तिमत्व म्हणून त्यांचा गौरव करण्यात आला आहे पुणे येथे पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शनिवार ३ मे २०२५
https://lokaarambh.com


# पर्यटकांना बंदी, मदरसे ओस, हॉटेल, गेस्ट हाऊसमध्ये सैन्याने ठोकला तळ,

# PoK मध्ये Emergency

**पाकव्याप्त काश्मीरमध्ये सध्या आपत्कालीन परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे. युद्धाला केव्हाही तोंड फुटू शकते, त्यामुळे या भागात दहशतीचे वातावरण आहे. पाकिस्तानी लष्कराविरोधातही असंतोष धुमसत असल्याचे दिसून येते.**

पाकव्याप्त काश्मीरमध्ये (PoK) भारत केव्हा पण हल्ला करण्याची शक्यता आहे. पहलगाम हल्ल्यानंतर दोन्ही देशात तणाव आहे. पाकिस्तानमध्ये गेल्या आठवडाभरापासून युद्धाची तयारी सुरू आहे. पाकिस्तानने देशातंर्गत सुद्धा युद्धाची तयारी सुरू केली आहे. सायरन बसवण्यात आले आहे. तर दुसरीकडे नियंत्रण रेषेवर पाकिस्तानी सैन्य तैनात करण्यात आले आहे. दुसरीकडे पाकव्याप्त काश्मीरमध्ये अगोदरच पाकिस्तानी लष्काराविरोधात तीव्र संताप आहे. त्यात भारताकडून हल्ल्याची शक्यता लक्षात घेता गुरूवारी पीओकेमध्ये आपत्कालीन परिस्थिती लागू करण्यात आली. पीओकेच पंतप्रधान चौधरी अनवर उल हक यांनी ही घोषणा केली. सुरक्षेसाठी नीलम खोरे आणि नियंत्रण रेषेजवळ पर्यटनाला पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. तर मदरशांमध्ये पुढील 10 दिवस सर्व धार्मिक कार्यक्रम स्थगित करण्यात आले आहेत.

**PoK सरकार दहशतीत**

पीओके सरकार भारत केव्हा सुद्धा हल्ला करणार या भीतीने दहशतीत आहे. हल्ला झाल्यास जेवण, औषधी




आणि इतर अत्यावश्यक वस्तूंची कमतरता पडू नये यासाठी पूर्ण तयारी करण्यात आली आहे. युद्ध झाल्यास आर्थिक रसद कमी पडू नये यासाठी आपात्कालीन निधी तयार करण्यात आला आहे. जवळपा एक अब्ज रुपये राखून ठेवण्यात आले आहेत. तर पाकव्याप्त परिसरातील सर्व हॉटेल, गेस्टहाऊस आणि मंगलकार्यालयांचा ताबा पाकिस्तानी लष्कराने घेतला आहे. या वास्तूंच्या मालकांकडून ते बळजबरीने घेण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे. तर आपण सैन्यासाठी या वस्तू सोडत असल्याचे त्यांच्याकडून वदवून घेण्यात येत आहे. पर्यटकांना घातली बंदी गुरुवारी अधिकाऱ्यांनी नीलम खोरे, किशनगंगा नदी परिसर आणि संवेदनशील परिसरात पर्यटनासाठी पूर्णपणे बंदी घातली. अनेक पर्यटकांना मार्बल चेकपोस्टवरूनच परत पाठवण्यात आले. लिपा खोऱ्यामध्ये नियंत्रण रेषेजवळ जाण्यास पाकिस्तानी लष्कराने बंदी घातली आहे. तर या भागातील मदरशांना पुढील 10 दिवस कुठालाही धार्मिक कार्यक्रम घेण्यास बंदी घालण्यात आली आहे. तर पाकिस्तानमधील कराची आणि लाहोर हवाई क्षेत्र पुढील एक महिना प्रत्येक दिवशी सकाळी 8 ते संध्याकाळी 4 वाजेपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# हृदयरोगतज्ञ डॉ. सुनील बोबडे सर यांच्यावर वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव

बीड: बीड येथील मेडिकेअर हार्ट हॉस्पिटलचे प्रसिद्ध हृदय रोग तज्ञ डॉक्टर सुनील बोबडे सर हे सर्वसामान्यांचे डॉक्टर म्हणून ओळखले जातात. बीड पासून जवळच असलेल्या नाळवंडीच्या शेजारी दहिफळ चे रहिवासी, लहानपणीच आई-वडिलांचे छत्र हरवल्यामुळे डॉक्टरांना त्यांची हुशारी पाहून गावातील लोकांनी शिक्षणासाठी मदत केली. कठीण परिस्थितीतून डॉक्टरांनी शिक्षण घेतले आणि ते पुढे डी एम कार्डिओलॉजिस्ट झाले. डॉक्टरांनी गुजरात येथे आपलं शिक्षण पूर्ण करून तिथेच महिना 15 लाख रुपये ची नोकरी केली



परंतु आपल्या परिस्थितीचा विचार करून आपल्या मातीतील लोकांची सेवा करायची सेवावृत्ती त्यांना येथे घेऊन आली आणि त्यांनी बीडच्या एसपी ऑफिस समोर मेडिकेअर सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल या नावाने हॉस्पिटल सुरू करून लोकांची सेवा सुरू केली. अत्यंत अल्प दरात व गरज पडल्यास मोफत सेवा करून डॉक्टरांनी लोकांचे मन जिंकले लोकांची सेवा करता यावी म्हणून त्यांनी आपल्या हॉस्पिटलमध्ये शासनाच्या वेगवेगळ्या मोफत स्कीम आणल्या. जिल्ह्यातच नव्हे तर जिह्ला बाहेरही त्यांच्या नावाची ख्याती झाली. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त प्रत्यक्ष त्याची प्रचिती आली आज सकाळपासूनच लोकांनी हॉस्पिटलमध्ये प्रचंड गर्दी केली शहरातील व जिल्ह्यातील सर्व डॉक्टर, इंजिनिअर, राजकीय नेते मंडळी, व्यापारी, व सर्वसामान्य लोकांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून डॉक्टरांना भरभरून शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉक्टरांना शुभेच्छा देण्यासाठी डॉ. माधव सानप सर ,डॉ. गणेश डोळे सर ,डॉ. विशाल कोटेचा सर, डॉ. हर्षल बडजाते सर, डॉ. अनिल सानप सर, डॉ.जगदीश कंठाळे सर, डॉ.संदीप मुनोत सर, माजी नगराध्यक्ष दिलीप अण्णा गोरे, माजी सभापती विलास भाऊ विधाते, डॉ. सुरेश पिंपळे, नवनाथ अण्णा शेरकर, Aclap चे भावी अध्यक्ष वसंत गायके, अतुल पवणे, अमित पवणे, राहूल आघाव हॉस्पिटल मधील सर्व स्टाफ व जिल्ह्यातील शेकडो लोकांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून डॉक्टरांना शुभेच्छा दिल्या

# लिंबागणेश येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी




लिंबागणेश:- ( दि.२ ) बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. दि.३० बुधवार रोजी सकाळी पंचशील नगर येथे सरपंच बालासाहेब जाधव यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. उपसरपंच बाळकृष्ण थोरात, ग्रामपंचायत सदस्य,मान्यवरांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून बौद्ध वंदना घेऊन अभिवादन करण्यात आले.यावेळी कार्यक्रमाचे आयोजन भिम टायगर ग्रुप बीड जिह्लाध्यक्ष रविंद्र निर्मळ, सुरेश निर्मळ केले. अध्यक्षस्थानी असलेल्या रविंद्र निर्मळ यांनी भारत देशातील सर्व नागरिकांना सामाजिक न्याय मिळवून देणा-यासाठी देशाला बाबासाहेबांच्या विचारांची गरज असल्याचे प्रतिपादन केले. सायंकाळी ५ वाजता गावातील प्रमुख चौकातुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची निळ्या ध्वजांनी सुशोभित सजवलेल्या रथातून मिरवणूक काढण्यात आली. आदल्यादिवशी भिमगीत गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमाचे आयोजन जितेंद्र निर्मळ, बालाजी निर्मळ,आरूण निर्मळ, पप्पू निर्मळ यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक भिमजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष शंकर निर्मळ , उपाध्यक्ष अमोल निर्मळ, सचिव स्वप्निल वक्ते, कोषाध्यक्ष स्वप्निल निर्मळ ,सौरभ, निर्मळ, तुळशीराम पवार, तुकाराम गायकवाड , प्रकाश निर्मळ, पोपट निर्मळ, ज्ञानोबा निर्मळ आदिच्या पुढाकाराने आयोजित कार्यक्रमात मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी सहभागी होऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.

# महाराष्ट्र दिनानिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात ध्वजारोहण



संभाजीनगर, दि.01 :- महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या वर्धापन दिनानिमित्त विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित कार्यक्रमात अप्पर आयुक्त बाबासाहेब बेलदार, विजयसिंह देशमुख, डॉ.अनंत गव्हाणे, खुशालसिंह परदेशी, नगर रचनाकार हर्षल बाविसकर, नगर रचना विभागाचे उपसंचालक रवींद्र जायभाये, नगर प्रशासन विभागाचे देविदास टेकाळे, यांच्यासह वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# माजलगाव धरणाच्या निसर्गरम्य वातावरणात क्रिकेट स्पर्धा. आदर्श देवगावच्या युवकांचे उत्कृष्ट नियोजन क्रिकेट प्रीमियर लीग शुभारंभ उद्घाटन कार्यक्रम संपन्न,

वडवणी प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील आदर्श देवगाव या ठिकाणी भव्य क्रिकेट प्रीमियर लीग चा उद्घाटन शुभारंभ कार्यक्रम संपन्न झाला, यावेळी या उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी उपस्थित, परडी माटेगाव चे विद्यमान सरपंच माधव शेंडगे, शेतकरी नेते जगदीश फरताडे, आदर्श देवगाव चे माजी सरपंच माऊली सुरवसे, विद्यमान सरपंच मुकुंद सुरवसे, उपसरपंच तथा सामाजिक कार्यकर्ते महादेव सुरवसे,युवा पत्रकार अंकुश गवळी. माजी सरपंच लखन महागोविंद, सामाजिक कार्यकर्ते विष्णुपंत नेमाटे. सखाराम सुरवसे .सचिन सुरवसे .राहुल सुरवसे .अंकुश ईतापुरे. ह. भ. प. मच्छिंद्रनाथ महाराज गवळी गोविंद महाराज सुरवसे आदी मान्यवरांच्या उपस्थिती क्रिकेट प्रीमियर लीग उद्घाटन समारंभ कार्यक्रम संपन्न झाला, यावेळी माजलगाव धरणाच्या निसर्गरम्य वातावरणात क्रिकेट स्पर्धा खूप मोठ्या प्रमाणात पार पडत आहेत, यावेळी पंचक्रोशीतील क्रिकेट प्रेमींनी युवकांनी मोठ्या संख्येने माजलगावच्या धरणाच्या परिसरात



क्रिकेट स्पर्धा पाहण्याकरिता यावे व क्रिकेट प्रेमींना वाव मिळवण्यासाठी तरुणांनी क्रिकेट प्रेमींनी यावे असे आव्हान आयोजक तथा गावातील युवकांनी केले आहे.

# अणूबॉम्बचा माज दाखवणाऱ्या पाकिस्तानवर तीचे अणवस्त्र लपवण्याची आली वेळ

पाकिस्तान सध्या चहूबाजूंनी तणावाखाली आहे. पाकिस्तानचे पंतप्रधान, मंत्री, नेते, सेनाप्रमुख सगळे टेन्शनमध्ये आहेत, कारण त्यांना माहित आहे, भारत पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदला घेऊन राहणार. पाकिस्तानवर भारताचा प्रहार कधीही होऊ शकतो. हल्ल्याच्या भितीने पाकिस्तानचे नेते इतके गोंधळून गेले आहेत की, ते भारतात सारखी अणवस्त्र हल्ल्याची धमकी देत आहेत. पाकिस्तानकडून एकाबाजूला अणवस्त्र हल्ल्याची धमकी दिली जात आहे, तर दुसऱ्याबाजूला पाकिस्तान आपली अणवस्त्र लपवत आहे. पाकिस्तान असं यासाठी करतोय, कारण त्यांच्या अणवस्त्रांवरच हल्ला होऊ शकतो.

पाकिस्तानची अणवस्त्र सेंटरवर सध्या प्रचंड तणाव आहे. त्यांच्या अणवस्त्रांच्या बेसला धोका आहे. यात कहुटा, गडवाल, फतह जंग, वाह, शाका दारा, चश्मा, खुशाब, डेरा गाजी खान आणि निलोर हे बेस आहेत. कराचीजवळचा मासरूर एअरबेस हा अणूबॉम्ब घेऊन जाणाऱ्या विमानांसाठी बेस आहे. पाकिस्तानच्या या दहा अणवस्त्र केंद्रांवर हल्ल्याचा धोका आहे. पाकिस्तानची अणवस्त्र कुठल्या दोन फ्रंटवरुन उद्धवस्त होऊ शकतात, ते जाणून घ्या.पाकिस्तानकडे किती अणूबॉम्ब?पाकिस्तानच्या अणवस्त्रांना आतापर्यंतचा सर्वात मोठा धोका उत्पन्न झाला आहे. फेडरेशन ऑफ अमेरिकन सायटिस्ट्सच्या रिपोर्टनुसार, पाकिस्तानकडे 170 अणूबॉम्ब आहेत. पाकिस्तानच्या या अणवस्त्रांवर आणि



अणू केंद्रांना धोका आहे. भारत या अणवस्त्र तळांना लक्ष्य करेल ही भिती पाकिस्तानच्या मनात आहे. दुसरी भिती TTP ची आहे. त्यांची सुद्धा पाकिस्तानच्या अणवस्त्रांवर नजर आहे.पाकिस्तानच्या अणवस्त्रांवर अजून कोणाची नजर? तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान म्हणजे TTP कडून पाकिस्तानवर हल्ले सुरु आहेत. TTP पाकिस्तानला त्यांच्या अणवस्त्र साठ्यापर्यंत पोहोचायचं आहे. एकाबाजूला टीटीपी आणि दुसऱ्याबाजूला भारत. या दुतर्फा धोक्यामुळे पाकिस्तानने आपली अणवस्त्र दुसऱ्या ठिकाणी शिफ्ट केली आहेत. त्यांची सुरक्षा सुद्धा वाढवली आहे. पाकिस्तान फक्त अणवस्त्रच नाही, तर त्या सर्व मोठ्या शस्त्रांना लपवत आहे, ज्यांना भारत टार्गेट करु शकतो.ग्वादर बंदर का रिकामी केलं?पाकिस्तानने त्यांची F-16 फायटर विमान सुद्धा लपवली आहेत. आपल्या युद्धनौकांची जागा सुद्धा बदलली आहे. पाकिस्तानला भिती आहे की, भारत ग्वादर बंदरावर हल्ला करेल. त्यामुळेच ग्वादर बंदरातून त्यांनी सर्व युद्धनौका हलवल्या आहेत. काही दिवसांपूर्वी येथे पाकिस्तानची 7 जहाजं होती. आता ग्वादर बंदर रिकामी आहे. महाराष्ट्राचा स्वाभिमान गहाण ठेवला पहलगामच्या हल्ल्यानंतर महाराष्ट्रातील पर्यटकांना कश्मीरमधून परत आणण्यासाठी महाराष्ट्रातील राज्यकर्त्या पक्षांमध्ये जुंपलेली श्रेयवादाची लाजीरवाणी लढाई उभ्या महाराष्ट्राने पाहिली. पुन्हा जणूकाही आपल्याच खिशातून खर्च करून पर्यटकांना परत आणतोय, असा नकली आव काहींनी आणला. मात्र पर्यटकांना सरकारी खर्चानेच परत आणल्याचा भंडाफोड झाला आणि फुकाच्या गप्पा ठोकणाऱ्यांची तोंडे बंद झाली. पहलगामच्या हल्ल्यात महाराष्ट्रातील 6 पर्यटक मृत्युमुखी पडले.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com